सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६**

# महाराष्ट्र पोलीस अधिकारी (पदनामांत बदल करण्याबाबत) अधिनियम, १९६२

( दिनांक २१ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित )

**Maharashtra Act No. XLVI of 1962**

# The Maharashtra Police Officers (Change In Designation) Act, 1962

*(As modified upto 21st Sept., 2011)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रसिध्दि, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१२

[किंमत रु. ३.००]

# महाराष्ट्र पोलीस अधिकारी
# (पदनामांत बदल करण्याबाबत) अधिनियम, १९६२

( दिनांक ११ जुलै, २००६ पर्यंत सुधारित )

**अनुक्रमणिका**


**उद्देशिका.**

| **कलमे.** | | **पृष्ठ** |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. .. .. .. | १ |
| २. | विवक्षित पोलीस अधिकाऱ्यांच्या पदनामांत बदल होणे. .. .. | १ |
| ३. | विवक्षित अधिनियमात परिणामभूत सुधारणा. .. .. | १ |
| अनुसूची. | .. .. | २ |


----------

# सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ [१]

## [ महाराष्ट्र पोलीस अधिकारी (पदनामांत बदल करण्याबाबत) अधिनियम, १९६२]

## [ १८ डिसेंबर, १९६२ ]

**पोलीस आयुक्ताच्या अधिकाराखाली असलेल्या कोणत्याही क्षेत्रांतील पोलीस अधीक्षकाच्या आणि इतरत्र जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या पदनामांत बदल करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पोलीस आयुक्ताच्या अधिकाराखाली असलेल्या कोणत्याही क्षेत्रांतील पोलीस अधीक्षकाच्या आणि इतरत्र जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या पदनामांत बदल करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस अधिकारी (पदनामांत बदल करण्याबाबत) अधिनियम, १९६२ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, राज्य शासन **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करुन जो दिनांक नेमून देईल त्या दिनांकास अंमलात येईल.

(२) पोलीस आयुक्ताच्या अधिकाराखाली असलेल्या कोणत्याही क्षेत्रांतील पोलीस अधीक्षक आणि इतर कोणत्याही क्षेत्रांतील जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या सध्याच्या पदनामांत याद्वारे बदल करण्यात येत आहे आणि त्याऐवजी त्यांना अनुक्रमे सहायक पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक अशी पदनामे देण्यात येतील; आणि त्यानुसार, त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा कोणताही संलेख अथवा इतर दस्तऐवज यात यथास्थिति, पोलीस अधीक्षक किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक याचा कोणत्याही शब्दांत करण्यात आलेला कोणताही उल्लेख हा, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, यथास्थिति, सहायक पोलीस आयुक्ताविषयी किंवा पोलीस अधीक्षकाविषयी करण्यात आलेला उल्लेख आहे असे समजण्यात आले पाहिजे. **विवक्षित पोलीस अधिकाऱ्यांच्या पदनामांत बदल होणे.**

(३) अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमात त्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या रीतीने व त्यामर्यादेपर्यंत याद्वारे सुधारणा करण्यात येत आहे. **विवक्षित अधिनियमांत परिणामभूत सुधारणा.**

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी, महाराष्ट्र शासन राजपत्र,१९६२, भाग पाच, इं.पृष्ठ ३०६ पहा.

## अनुसूची

**[ कलम ३ पहा ]**

| अधिनियम<br>१ | सुधारणा<br>२ |
|---|---|
| **मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२)** | (१) अन्यथा स्पष्टपणे जी कोणतीही तरतूद केली असेल ती खेरीज करुन, या अधिनियमांत (समास टीपांचा समावेश करुन) सर्वत्र, '' जिल्हा पोलीस अधीक्षक'' हे शब्द जेथे जेथे येतील तेथे तेथे त्या शब्दाऐवजी ''पोलीस अधीक्षक'' हे शब्द दाखल करण्यात येतील ;<br><br>(२) कलम २, खंड (६) यांतील, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दांऐवजी ''जिल्हा अधीक्षक'' हे शब्द दाखल करण्यात येतील.<br><br>(३) **कलम ८ यांत** :—<br><br>(अ) पोट-कलम (१) मध्ये, ''अधीक्षक'' या शब्दाऐवजी ''पोलीस अधीक्षक'' हे शब्द दाखल करण्यात येतील.<br><br>(ब) समास टीपेतील ''जिल्हा अधीक्षक'' या शब्दांऐवजी ''अधीक्षक आणि'' हे शब्द दाखल करण्यात येतील.<br><br>(४) **कलम १० यांत** :—<br><br>(अ) पोट-कलम (१) मधील, ''आणि एक किंवा अनेक सहायक पोलीस आयुक्त'' हे शब्द वगळण्यात येतील ;<br><br>(ब) पोट-कलम (२) मधील, ''किंवा सहायक आयुक्त'' व ''किंवा सहायक आयुक्त'' हा मजकूर वगळण्यात येतील ;<br><br>(क) समास टीपेतील ''आणि सहायक'' शब्द वगळण्यात येतील. ;<br><br>(५) **कलम ११ यांत** :—<br><br>(अ) पोट-कलम (१) मधील, ''पोलीस अधीक्षक'' या शब्दांऐवजी ''सहायक पोलीस आयुक्त'' हा शब्द दाखल करण्यात येईल.<br><br>(ब) पोट-कलम (२) मधील, ''अधीक्षकाने'' या शब्दाऐवजी ''सहायक आयुक्ताने'' हे शब्द दाखल करण्यात येतील आणि ''अधीक्षकास'' या शब्दाऐवजी, ''सहायक आयुक्तास'' हे शब्द दाखल करण्यात येतील.<br><br>(क) समास टीपेतील, ''अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''सहायक आयुक्त'' हे शब्द दाखल करण्यात येतील. |

**अनुसूची-**चालू

| १ | २ |
|---|---|
| | (६) **कलम १२ यांत** :— <br> पोट-कलम (२) मधील, ''पोलीस अधीक्षकाच्या'' या शब्दाऐवजी, ''सहायक आयुक्ताच्या'' हे शब्द दाखल करण्यात येतील. <br> (७) **कलम ६३ अअ** :— <br> पोट-कलम (१) मधील, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या मजकुराऐवजी, ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७ (सन १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८)** | (१) कलम (१) मधील, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक '' हा शब्द दाखल करण्यात येईल. <br> (२) **कलम ४ मध्ये** :— <br> (अ) ''जिल्हा पोलीस अधीक्षकास'' या शब्दाऐवजी ''पोलीस अधीक्षकास'' हा शब्द दाखल करण्यात येईल. <br> (ब) समास टीपेतील ''जिल्हा अधीक्षक'' या शब्दाऐवजी ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४)** | (१) **कलम ६ मध्ये** :— <br> (अ) खंड (२) मध्ये, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल ; <br> (ब) परंतुकातील , ''जिल्हा'' या शब्दाऐवजी ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. <br> (२) कलम ११ मध्ये, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **मुंबई मद्यनिषेध अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५)** | (१) **कलम १२८, पोट-कलम (१) मध्ये** :— <br> (अ) ''पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी ''सहायक पोलीस आयुक्त'' हा शब्द दाखल करण्यात येईल ; <br> (ब) ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८)** | (१) कलम ५, पोट-कलम (१) मध्ये, ''जिल्हा अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. <br> (२) कलम ६, पोट-कलम (१) मध्ये, ''जिल्हा अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |

**अनुसूची-**समाप्त

| १ | २ |
|---|---|
| **मुंबई राज्य पोलीस कमिशनर अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६)** | (१) कलम २ मध्ये खंड (अ) मधील, ''किंवा सहायक पोलीस कमिशनर'' हे शब्द वगळण्यात येतील.<br>(२) कलम ४ ते ८ मध्ये (दोन्हीं कलमे धरून) व त्यांच्या समास टीपांतील, '' जिल्हा पोलीस अधीक्षक'' हे शब्द जेथे जेथे येतील तेथे त्या शब्दांऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **प्राण्यांस निदर्यतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९० (सन १८९० चा अधिनियम क्रमांक ११)** | (१) कलम ८, पोट-कलम (१) मध्ये, '' जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल.<br>(२) कलम १०, पोट-कलम (१) मध्ये, '' जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **प्राण्यांस निदर्यतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, (सन १३१३ फसलीचा हैदराबाद अधिनियम क्रमांक १)** | कलम ५-इ पोट-कलम (१) मध्ये, '' जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **दंड प्रक्रिया संहिता, १८९८ (सन १८९८ चा अधिनियम क्रमांक ५)** | (१) **कलम ८३ मध्ये** :—<br>(अ) पोट-कलम (१) यांत, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल ;<br>(ब) पोट-कलम (२) मध्ये, ''जिल्हा अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल,<br>(२) कलम ८५ मध्ये, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''पोलीस अधीक्षक'' हा शब्द आणि ''जिल्हा अधीक्षक'' या शब्दाऐवजी ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल.<br>(३) कलम ८६, पोट-कलम (१) मध्ये, ''जिल्हा अधीक्षक'' हा शब्द जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याऐवजी ''अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल.<br>(४) कलम ९५, पोट-कलम (२) मध्ये, ''जिल्हा पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, '' पोलीस अधीक्षक'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| **लाचलुचपत, प्रतिबंधक अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम क्रमांक २)** | कलम ५-अ, खंड (ब) मधील, ''पोलीस अधीक्षक'' या शब्दाऐवजी, ''सहायक पोलीस कमिशनर'' हा शब्द दाखल करण्यात येईल. |

शामुको.-एच ३५८-२,५५०-११-२०१२

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते